# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

जा.क्र./गो.वि.ग./म.वि.वि.वि./४१४ /२०२५ दि. ११ /०७/२०२५

## परिपत्रक

विषय:- महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या वाढविण्याकरीता उपाययोजना करणेबाबत.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या वाढवी, त्यांना दर्जेदार शिक्षण, प्रशिक्षण मिळावे व विद्यार्थी शिकण्यासाठी उपस्थित राहावे, याकरीता उपाययोजना करणे आवश्यक आहे. करीता सर्व संलग्नित महाविद्यालयांनी महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या वाढविण्याकरीता खालीलप्रमाणे दिलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी. जेणेकरुन महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या वाढवण्यास मदत होईल.

१. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांनी चालु शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक विद्यापीठात सादर करावे. महाविद्यालयांनी वेळापत्रकानुसार तासिका होत आहे की नाही याची मा. प्राचार्य यांनी तपासणी / पडताळणी करण्यात यावी.

२. अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयातील घडयाळी तासिका तत्वावरील शिक्षकांच्या नियुक्त्या दिनांक १५ जुलै, २०२५ पर्यंत करण्यात याव्या.

३. सर्व संलग्नित महाविद्यालयांनी पुर्णवेळ प्राचार्याची नियुक्ती करण्यात यावी.

४. प्राचार्य व प्राध्यापक यांनी पुर्णवेळ महाविद्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

५. ग्रंथालय, रिडींग रुम, क्रिडा याकरीता विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे शुल्क त्या त्याबाबीवर खर्च होत आहे किंवा नाही याची मा. प्राचार्य यांनी पडताळणी करण्यात यावी.

६. प्राध्यापक व विद्यार्थी यांची प्रत्येक महिन्याची दैनंदिन उपस्थिती मा. प्राचार्य यांनी तपासण्यात यावी.

७. महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि व्यक्तीमत्व विकास विभागाच्या विविध योजना राबविण्यात याव्यात.

८. कायम विना अनुदानित महाविद्यालयात पदवीकरीता विद्याशाखानिहाय किमान एक पुर्ण वेळ अर्हताधारक शिक्षक नियुक्त करावे. तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता विषयनिहाय पुर्ण अर्हताधारक किमान एक शिक्षक नियुक्त करावा.

मा. प्र-कुलगुरु यांच्या मान्यतेने,

( श्री. दिनेश नरोटे )
सहायक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी:-

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली